

**शिखर पहारिया यांनी केली वाचनालय उपक्रमासाठी 1,000 पुस्तके दान**

e Paper

# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3रे

www.metrocityvrutant.in | गुरुवार दिनांक 01/05/२०25 | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 92 || RNI - MAHMAR51259 || metrocity924@gmail.com


## 'सीआयएससीई'कडून दहावी, बारावीचा निकाल जाहीर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : कौन्सिल फॉर द इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झामिनेशनतर्फे (सीआयएससीई) घेण्यात आलेल्या दहावी (आयएससीई) आणि बारावीच्या (आयएससी) परीक्षांचा निकाल जाहीर केला. त्यानुसार दहावीचा निकाल ९९.०९ टक्के लागला असून, बारावीचा निकाल ९९.०२ टक्के लागला. महाराष्ट्राचा दहावीचा निकाल ९९.९० टक्के, तर बारावीचा निकाल ९९.८१ टक्के लागला.यंदा देशभरातील २ हजार ८०३ शाळांतून २ लाख ५२ हजार ५५७ विद्यार्थ्यांनी दहावीची, तर १ हजार ४६० शाळांतून ९९ हजार ५५१ विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली होती. त्यात दहावीचे २ लाख ५० हजार २४९ विद्यार्थी, तर बारावीचे ९८ हजार ५७८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.दोन्ही परीक्षांमध्ये मुलांच्या तुलनेत उत्तीर्णतेची टक्केवारी अधिक आहे. दहावीच्या परीक्षेत मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ९९.३७ टक्के होते, तर ९८.८४ टक्के मुले उत्तीर्ण झाले. तसेच बारावीच्या परीक्षेत ९९.४५ टक्के मुली, तर ९८.६४ टक्के मुले उत्तीर्ण झाले.दहावीच्या निकालात पश्चिम विभागाने ९९.८३ टक्क्यांसह आघाडी घेतली. त्या खालोखाल दक्षिण विभागाचा ९९.७३ टक्के लागला. उत्तर विभागाचा ९८.७८ टक्के, पूर्व विभागाचा ९८.७० टक्के, तर परदेशी विद्यार्थ्यांचा ९३.३९ टक्के निकाल लागला. तर बारावीच्या परीक्षेत दक्षिण विभागाचा ९९.७६ टक्के, पश्चिम विभागाचा ९९.७२ टक्के, पूर्व विभागाचा ९८.७६ टक्के, उत्तर विभागाचा ९८.९७ टक्के, परदेशी विद्यार्थ्यांचा १०० टक्के निकाल लागला.

## राज्यातील सुरक्षा रक्षक आता 'खाकी वर्दी'मध्ये दिसणार!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : राज्यातील सुरक्षा रक्षक आता 'खाकी वर्दी'मध्ये दिसणार आहेत. याचा अर्थ सुरक्षा रक्षक पोलीस दलात जाणार असा नसून त्यांच्या गणवेशाचा रंग खाकी राहणार आहे. नोंदणीकृत सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी खाकी रंगाच्या गणवेशास राज्य शासनाने मान्यता दिली. यामध्ये टोपी निळ्या रंगाची असून, त्यावर सुरक्षा रक्षक मंडळाचा लोगो व नाव असेल. कामगार दिनाचे औचित्य साधून हा खाकी गणवेश १ मेपासून राज्यभरात अंमलात येणार आहे.सुरक्षा रक्षकाचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांचे आणि सामानाचे संरक्षण करणे आहे. मालमत्तेची सुरक्षा, आपत्कालीन बचाव, आपत्कालीन व्यवस्थापन सेवा, सुरक्षा गस्त, गुन्ह्यांना सक्रियपणे रोखणे, संशयास्पद हालचालींवर काळजीपूर्वक लक्ष ठेवणे, एखादी समस्या उद्भवल्यास कारवाई करणे, हस्तक्षेप करणे किंवा पोलीस अधिकाऱ्यांशी संपर्क करणे आदी त्यांचे कर्तव्य आहेत. कोणत्याही सुरक्षा रक्षकासाठी सर्वात महत्त्वाचा नियम म्हणजे सतर्क राहणे आहे.महाराष्ट्र राज्यातील सुरक्षा रक्षक मंडळाच्या नोंदणीकृत सुरक्षा कर्मचाऱ्यांसाठी नव्याने निश्चित करण्यात आलेल्या खाकी रंगाच्या गणवेशाचे अनावरण कामगार मंत्री अ‍ॅड.आकाश फुंडकर यांच्या हस्ते करण्यात आले.या उपक्रमामुळे सुरक्षा रक्षकांची ओळख एकसमान राहील व त्यांच्या शिस्तबद्धतेत भर पडेल. तसेच या नव्या गणवेशामुळे राज्यातील सुरक्षा व्यवस्थेला अधिक सुसंगत व व्यावसायिक स्वरूप प्राप्त होणार असल्याचे कामगार मंत्री अ‍ॅड. आकाश फुंडकर यांनी यावेळी सांगितले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 01/05/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# महिला व बालकांची सुरक्षा व आरोग्यासाठी

## गेस्टॅम्प ऑटोमोटिव्ह्स आणि होप फाउंडेशन कडून ५ चारचाकी गाड्यांचे वाटप



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे, चाकण एमआयडीसीमध्ये स्थापित असलेल्या सुप्रसिद्ध अशा गेस्टॅम्प आॅटोमोटिव्ह्ज इंडिया कंपनी आणि होप फॉर द चिल्ड्रेन फाउंडेशन च्या वतीने आपली समाजिक जबाबदारी लक्षात घेऊन महिला व बालकांची सुरक्षा आणि त्यांच्या आरोग्य संवर्धनासाठी आरोग्य विभाग ,पुणे, ग्रामीण पोलीस आयुक्तालय कार्यालय व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय सरकारी विभागांसाठी ५ स्कोडा कायलॅक गाड्यांचे वाटप यावेळी फीत कापून तसेच हिरवा झेंडा दाखवून या गाड्या संबंधित विभागांकडे रवाना करण्यात आल्या.

या कारवाटप कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून गेस्टॅम्पच्या आशिया विभागाचे सीईओ अँटोनियो लोपेझ उपस्थित होते. याशिवाय जिल्हा रुग्णालय, औंधचे सिव्हिल सर्जन डॉ. नागनाथ एस. यम्पल्ले, डॉ. अमित लवेकर , मानसोपचार तज्ज्ञ, सहायक सिव्हिल सर्जन, जिल्हा रुग्णालय, औंध. गेस्टॅम्प आॅटोमोटिव्हजचे कंट्री सीईओ आणि अध्यक्ष ग्लिन जोन्स, कंट्री सीएफओ व प्रादेशिक वित्त संचालक अजय चौधरी, होप फॉर द चिल्ड्रेन फाउंडेशनच्या सीईओ डॉ. कॅरोलिन ओडीअर दि वॉल्टर, भरोसा सेलच्या पोलिस उपनिरीक्षक अनुराधा पाटील आणि पोलीस निरीक्षक प्रवीण कांबळे म्हाळुंगे पोलीस स्टेशन यांच्यासह कंपनीचे इतर अधिकारी, तसेच पोलिस व आरोग्य खात्यातील अधिकारी उपस्थित होते.

गेस्टॅम्प ऑटोमोटिव्ह्सचे आशिया विभागाचे सीईओ अँटोनियो लोपेझ म्हणाले, "गेस्टॅम्पमध्ये आम्ही असा विश्वास ठेवतो की शाश्वत विकासाची सुरुवात समुदायांच्या सक्षमीकरणातून होते. होप फॉर द चिल्ड्रेन फाउंडेशनसोबतच्या या भागीदारीद्वारे आम्ही केवळ वाहनेच देत नाही, तर प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्य, सुरक्षितता आणि सन्मानासाठी गुंतवणूक करत आहोत."

या उपक्रमामुळे मोबिलिटी, आऊटरिच व आपत्कालीन प्रतिसाद क्षमतेत वाढ होऊन, विशेषतः महिलांचे व बालकांचे आरोग्य व सुरक्षितता सुनिश्चित करण्यात मदत होईल आणि अधिक सुरक्षित, निरोगी समुदाय घडवता येईल.

डॉ. कॅरोलिन ओडीअर दि वॉल्टर, सीईओ, होप फॉर द चिल्ड्रेन फाउंडेशन यांनी सांगितले,"हा उपक्रम हे सुनिश्चित करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे की आरोग्य व संरक्षण सेवा गरजूंना सहज उपलब्ध होतील. गेस्टॅम्पसोबत मिळून आम्ही मजबूत व सुरक्षित समुदाय घडवण्याचा प्रयत्न करत आहोत, जिथे प्रत्येक मूल व प्रत्येक महिला सन्मानाने व आशेने जगू शकेल."

गेस्टॅम्प ऑटोमोटिव्ह्स इंडिया आणि होप फॉर द चिल्ड्रेन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने २०२५-२६ या वर्षासाठी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीचा अजेंडा अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आला आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश महिला आणि बालकांच्या आरोग्य व संरक्षण क्षेत्रात क्षमता निर्माण करून एक सशक्त समुदाय घडवण्याचा आहे.

समाज कल्याणासाठी आणि सातत्यपूर्ण वचनबद्धतेचा भाग म्हणून गेस्टॅम्प ऑटोमोटिव्ह्स आणि होप फॉर द चिल्ड्रेन फाउंडेशन यांच्या वतीने पाच स्कोडा कायलॅक कार महत्त्वाच्या शासकीय संस्थांना देणगी म्हणून प्रदान केली गेली. यामध्ये पोलिस यंत्रणा व आरोग्य यंत्रणांचा समावेश आहे.

# आकुर्डीत 'वारकरी भवन' उभारा..

## मा. उपमहापौर शैलजाताई मोरे व महाराष्ट्र वारकरी महामंडळाचे सचिव जयंत आप्पा बागलयांची आयुक्तांकडे मागणी...

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये याकरिता आकुर्डीतील पांडुरंग काळभोर सभागृह येथे 'वारकरी भवन' उभारण्यात यावे, अशी मागणी मा. उपमहापौर शैलजाताई मोरे यांनी समस्त वारकऱ्यांच्या वतीने महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेऊन त्यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी त्यांच्यासमवेत महाराष्ट्र वारकरी महामंडळाचे सचिव जयंत आप्पा बागल, हभप अनिकेत मोरे इनामदार, हभप जगन्नाथ नाटक पाटील, मा. नगरसेवक सुरेश भोईर, हभप दत्तात्रय साकोरे, हभप कैलास कातळे, किशोर पाटील, हभप जयवंतराव शिंदे, हभप खंडू मोरे, अरुण गोटे, किशोर पवार, संदीप भालके, किरण दळवी, हभप विनायक महाराज जगताप, राम साखरे, अभिजित वाघेरे, नरेश गुलानी, इंद्रजित पाटोळे, संदेश गोलांडे आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, श्री क्षेत्र देहू येथून प्रस्थान ठेवत श्री संत तुकाराम महाराज यांची पालखी हजारो वारकऱ्यांसह पिंपरी चिंचवड शहरात दाखल होते. या पालखीचा मुक्काम आकुर्डीतील विठ्ठल रुक्मिणी मंदीरात असतो. वर्षानुवर्षे परंपरागत हा पालखी सोहळा होत असताना पिंपरी चिंचवड शहराला वारक-यांची सेवा करण्याची संधी मिळते. त्यामुळे मुक्कामासाठी मोठ्या संख्येने येथे वारकरी येत असतात. जागेची



कमतरता असल्याने वारकऱ्यांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे त्यांच्यासाठी आकुर्डीतील प्रभाग क्रमांक १५ येथील पांडुरंग काळभोर सभागृह येथे सुसज्ज अशा 'वारकरी भवन'ची उभारणी करावी. त्यामध्ये वारकऱ्यांसाठी सर्व सुविधा उपलब्ध कराव्यात, ज्यामुळे मुक्कामादरम्यान वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही, असे या निवेदनात मा. उपमहापौर मोरे ,आप्पा बागल व वारकरी बधुंनी म्हटले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 01/05/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# भारतीयांमधील प्रोटीन गॅपवर मूठभर बदाम प्रभावी उपाय

## -अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्नियाचा दावा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे, भारतातील नागरिक आजही दैनंदिन आहारातील प्रथिनांच्या गरजा पूर्ण करण्यात मोठ्या आव्हानाला सामोरे जात आहे. आपल्या रोजच्या जेवणामध्ये कार्बोहायड्रेट्स मोठ्या प्रमाणात असले तरी, सर्व वयोगटांतील अनेक लोकांची आवश्यक प्रथिनांची गरज पूर्ण होत नाही. याबाबत जनजागृती वाढवण्यासाठी आणि प्रॅक्टिकल सोलुशन देण्यासाठी, अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्नियाने पुण्यात "अड्रेसिंग इंडियाज प्रोटीन गॅप : बेटर नुट्रीशन फॉर हेल्दीयर टुमारो' या विषयावर एक पॅनेल चर्चा आयोजित केली.

हा कार्यक्रम पुण्यातील रॅमी ग्रँड हॉटेल अँड स्पा येथे झाला आणि यामध्ये अभिनेत्री सोहा अली खान, फिटनेस एक्स्पर्ट यास्मिन कराचीवाला आणि रितिका समद्दार (रीजनल हेड - डायेटेटिक्स, मॅक्स हेल्थकेअर, नवी दिल्ली) यांसारख्या प्रसिद्ध व्यक्तींनी सहभाग घेतला. पॅनेलने भारतीय नागरिकांच्या पोषणातील प्रोटीन गॅपच्या(प्रथिनांची कमतरता) समस्येवर प्रकाश टाकला. आहारमधील छोटे छोटे बदल किती मोठी भूमिका निभावतात- रोज आहारात मूठभर



बदाम खाण्याने सर्व वयोगटांतील लोकांसाठी प्रोटीन लेव्हल सुधारण्यात कशी मदत होऊ शकते हे त्यांनी अधोरेखित केले.

सर्वांगीण वाढीस, आरोग्यास आणि ताकद वाढविण्यासाठी प्रोटीन अत्यावश्यक घटक आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी, तरुणांना ऊर्जा मिळवण्यासाठी आणि प्रौढांना स्नायूंची दुरुस्ती व संपूर्ण आरोग्यासाठी प्रोटीनची गरज असते. तरीही भारतीय आहार या बाबतीत कमी पडतो. उदाहरणार्थ, एका बाऊल डाळीमध्ये सुमारे 18 ग्रॅम प्रोटीन असते, जे सक्रिय जीवनशैली असलेल्या किंवा जास्त पोषणाची गरज असलेल्या घरातील लोकांसाठी पुरेसे नसते.

पॅनेलिस्ट्सनी असे सांगितले की संपूर्ण आहार बदलण्याची गरज नाही. फक्त आहारातील छोटे छोटे बदल — जसे की जेवणामध्ये किंवा नाश्त्यांमध्ये बदामांचे सेवन करणे परिणामकारक ठरू शकते. बदाम हे नैसर्गिक, प्लांट-बेस्ड प्रोटीन सोर्स आहेत, आणि 30 ग्रॅम सर्व्हिंगमध्ये सुमारे 6 ग्रॅम प्रथिने मिळतात. त्यासोबतच बदामांमध्ये मॅग्नेशियम, व्हिटॅमिन ई आणि झिंकसारखी प्रतिकारशक्ती व आरोग्यासाठी आवश्यक पोषकतत्त्वेही असतात.

सोहा अली खान म्हणाल्या, "जेव्हा मी घरी जेवण बनविण्याची तयारी करते, तेव्हा प्रोटीनला सर्वात वरचे स्थान असते. विशेषतः माझी मुलगी वाढत्या वयाची आणि खूप ॲक्टिव्ह असल्याने. बदाम हे आमच्यासाठी पोषणाचा सोपा आणि विश्वासार्ह स्रोत ठरले आहेत. शूट्सदरम्यान देखील मला बदाम खायला आवडतात. ते मला पचायला जड न वाटता एनर्जी देतात. मी माझ्या मुलीच्या आहारात, तिच्या नाश्त्यात किंवा सॅलडमध्ये देखील बदाम घालते. हा एक छोटा पण अर्थपूर्ण बदल आहे ज्यामुळे आपण दररोज पुरेशे प्रोटीन मिळवतो." यास्मिन कराचीवाला म्हणाल्या, "एक फिटनेस प्रोफेशनल म्हणून, मी नेहमी लोकांना एनर्जी, रिकव्हरी आणि स्ट्रेंथसाठी प्रोटीनचे असलेले महत्त्व सांगते. बदाम हे माझे नेहमीचे पर्याय आहेत कारण ते चांगल्या दर्जाचे प्लांट-बेस्ड प्रोटीन देतात, जे व्यायामानंतर/पोस्ट वर्कआऊट खूप उपयोगी पडतात. ते तुम्हाला तृप्त ठेवतात, त्यामुळे ते स्मार्ट स्नॅक चॉईस ठरतात. मी बदाम नेहमी बरोबर ठेवते, मग मी क्लायंट्सना ट्रेनिंग देत असेल किंवा शूटला जात असेल. बदाम शरीराला योग्य पोषण देण्याचा एक सोपा मार्ग आहे."

रितिका समद्दार म्हणाल्या, "भारतातील बऱ्याच लोकांच्या डेली प्रोटीन नीड पूर्ण होत नाहीत, हे तेव्हा कळते जेव्हा आपण त्यांचे आहार तपासून बघतो. ही गॅप भरून काढण्यासाठी,बदामासारखे प्रोटीन रिच फूड आहारात समाविष्ट करणे हा एक उत्तम मार्ग आहे. मी बदामांची शिफारस अनेक वेळा करते कारण ते सहज आहारात घेता येतात, विशेषतः कुटुंबांसाठी. बदाम प्रोटीन बरोबरच ते इतर आवश्यक पोषकतत्त्वेही देतात आणि बहुतांश पॅकेज्ड स्नॅक्सपेक्षा ते चांगले पर्याय आहेत. दररोज मूठभर बदामाचे सेवन केल्यास पोषण सुधारण्यात मोठा फायदा होते." आयसीएमआर आणि एफएसएसएआय सारख्या संस्थांनीही बदामाच्या पोषणमूल्याची कबुली दिली आहे. 'इट राईट ड्युरिंग कोविड-19' च्या मार्गदर्शक तत्वांमध्ये, बदामांना प्लांट प्रोटीनच्या चांगल्या स्रोतांपैकी एक म्हणून शिफारस करण्यात आली आहे, शिवाय व्हिटॅमिन ई आणि मॅग्नेशियमसारखी पोषकतत्त्वेही त्यातून मिळतात. आयसीएमआर ने देखील रोजच्या संतुलित आहारात नियमितपणे नट्स (सुकामेवा) समाविष्ट करण्याचा सल्ला दिला आहे. रोजच्या आहारात पुरेशी प्रोटीन मिळवणे फारसे कठीण किंवा महागडे नाही. रोजच्या साध्या निवडी जसे की नाश्त्यात बदाम खाणे- कुटुंबांला चांगल्या आरोग्याकडे नेणारे प्रभावी पाऊल ठरू शकते.

# मान्सूनपूर्व कामांसाठी समन्वय ठेवा ; जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : 'मान्सूनपूर्व कामांचे नियोजन करून ती पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावीत आणि कामे करताना सर्व संबंधित यंत्रणांनी एकमेकांशी समन्वय ठेवावा,' अशी सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केली. जिल्ह्यातील मान्सूनपूर्व तयारीसंदर्भातील आढावा बैठक डुडी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच झाली. निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विठ्ठल बनोटे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, कृषी, आरोग्य, पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका, नगर परिषद, पोलीस, महावितरण, वन विभाग, प्रादेशिक परिवहन कार्यालय, भारतीय हवामान विभागासह सर्व संबंधित विभागांचे उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार, मुख्याधिकारी (दूरदृष्यप्रणालीद्वारे) उपस्थित होते. 'जलसंपदा विभागाने पूररेषा निश्चित करून त्याची माहिती प्रशासनाला, महापालिकांना द्यावी, त्याप्रमाणे पूररेषेखाली येणाऱ्या झोपडपट्ट्या आणि अन्य अतिक्रमणे काढण्याची कार्यवाही संबंधित यंत्रणांनी करावी, पाणी पातळीत वाढ झाल्यानंतर करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत पूर नियंत्रण आराखडा निश्चित करावा,धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याबाबत नागरिकांना पूर्वसूचना वेळेत मिळेल, याबाबत नियोजन करावे,



तसेच सर्व धरणांची बांधकाम तपासणी पावसाळ्यापूर्वी करून

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 01/05/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# इलेक्ट्रिक स्कूटर कंपनी 'रिव्हर'ने केले महाराष्ट्रातील पहिल्या स्टोरचे उदघाटन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे, : इलेक्ट्रीक स्कूटर मॅनुफॅक्चरर कंपनी रिव्हर महाराष्ट्रातील आपल्या पहिल्या स्टोअरचे पुणे येथे उदघाटन केले आहे. हे स्टोअर ब्रँडचा स्ट्रॉंग हा दक्षिण भारतातील उद्योग समूह आहे. 1300 स्क्वेअर फूटमध्ये पसरलेलं खराडी येथील रिव्हर स्टोर हे रलास व्हील्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सहयोगाने सुरू करण्यात आले आहे. रिव्हर स्टोर ग्राहकांना इंडी, रिव्हरच्या सर्व ॲक्सरीझ आणि मर्चेंडाईज अर्थात ब्रँड बॉम्ब या प्रत्यक्ष प्रदर्शन पाहा . याशिवाय, या चंचल स्टोअरमध्ये एक पूर्ण तंत्रज्ञ केंद्र देखील आहे, ज्या क्षेत्रफळ 4000 स्क्वेअर फूट आणि स्टोअरच्या रेडियसच्या 4 ब्लॉकच आहे. स्टोअरच्या उदघाटन भाग द रिव्हरचे को-फाउंडर आणि चीफ एक्सिक्युटीव्ह ऑफिसर अरविंद मनी ते म्हणाले, "पुणे सहकारी हे संकटापासून ऑटो कालामोटिव्ह एक्सलेंसचे हव आहे. आम्ही जेव्हा इंडी लाँच केले, तेव्हा या शहरातून खूप प्री-ऑर्डर्स केली आणि आम्ही स्कूटर्समधील स्पोर्ट्स युटिलिटी वेहिकल (एसयूवी) येत असताना खूप उत्साही होतो. आम्ही आहोत. रिव्हर इंडीला या एका खास कुटुंबासाठी वेहिकल म्हणून प्रस्थापित करणे आमचं उद्दिष्ट आहे, जे स्टाइल आणि कन्विनियन्सला एकत्र आणतं. ही स्टोअर ही संग्रहली आमची पुणे आहे आणि पुणे येथे काही ठिकाणी नाशिक, नागपूर, मुंबई ठिकाणी स्टोअर्स उघडणार आहोत."

आपल्या नंतर, रिव्हर अतिरिक्त सहा भारत महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये 10 नवीन स्टोअर्स सुरू करून आपली प्रगती विकसित करण्याची योजना आखली आहे. कंपनी दक्षिण पक्षी विजयवाडा, त्रिभुज विजयवाडा, पाँडिचेरी आणि पलक्कड अशा ठिकाणी नवीन स्टोअर्स सुरू करण्याचा व्यवसाय विस्तार करणार आहे. रिव्हर वर्तमान उत्तर भारत विकास मार्केट विस्तारित आहे आणि पश्चिमेला, आपली मजबूत व्यवस्था त्यात पूर्ववत आहे. सध्या, कंपनी बेंगळुरू, हैदराबाद, चेन्नई, हुबळी, विशाखापट्टणम, कोची, कोयंबतूर, मैसूर, तिरुपती आणि इतर ठिकाणी 20 स्टोअर्स अॅब्युल करत आहे.

खराडीमधील रिव्हर स्टोरमध्ये ग्राहकायब्रंट वातावरण अनुभवाला येण्यासाठी वापरला जातो. ब्रँडची सौंदर्यदृष्टी शोधण्यासाठी नदीच्या सारांशाची आठवण करून संपूर्ण गोट्या आणि इतर सेंद्रिय आकारांचा समावेश करण्यात आला आहे ज्यातून इंडी तुमची जीवनातमीतून हे शोधण्यात आले आहे. ही गोष्ट रिव्हरच्या तत्वज्ञानाशी जुळते- 'लोकांना ते जिथे आहेत तिथून घेऊन जाणे'इंडियनची किंमत १,४४,४९९ (एक्स-शोरूम, पुणे) आहे. ग्राहक स्टोअरला भेटू शकतात राईड्स फॉरवर्ड. यासह ग्राहकांना स्टोअरचे ब्रँडेड वस्तुंची खरेदी करता येते, इंडी स्कूटर बुक देखील करता येईल. ग्राहकांना www.rideriver.com या संकेतस्थळ सुद्धा चाचणी राईड्स आणि वैधानिक खरेदी करता येईल.रिव्हर स्टोर, खराडीचा पत्ता शॉप नन. 2, गुविल लँडमार्क स्टील्स, ली न. 11, हिस्सा नन. 10, खराडी, पुणे, महाराष्ट्र - 411014 हा आहे.

रिव्हर बद्दल:

रिव्हर ही बेंगळुरू स्थिती इलेक्ट्रिक स्कूटर कंपनी आहे. डिझाईन आणि टेक्नॉलॉजी भर देत रिव्हर अशे ग्रुप्स बनवतात जे लोकांचे दिवस जीवनावर सकारात्मक परिणाम करतात. मार्च 2021 मध्ये अरविंद मणि आणि विपीन जॉर्ज यांनी ही कंपनी केली. रिव्हरला जपान-स्थित यामाहा मोटर कार्पोरेशन, मितसु अँड को.लिमिटेड, मारूबे कॉर्पोरेशन, दुबईस्थित अल फुतैम ग्रुप, ज लोवरकार्बन कॅपिटल, टोयोटा व्हेंचर्स, मणि व मोबिलिटी आणि ट्रक्स व्हीसी बेहतर मोठ्या उत्पादकांची आमची आहे.

# शिखर पहारिया यांनी केली वाचनालय उपक्रमासाठी 1,000 पुस्तके दान

## "बुकें पाठवा, बुके नव्हे" या बिरदेवच्या आवाहनाला दिला प्रेरणादायी प्रतिसाद




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

एका सशक्त पावित्र्यात, शिखर पहारिया यांनी नव्याने नियुक्त झालेल्या आयपीएस अधिकारी बिरदेव धोणे यांच्या प्रेरणादायी उपक्रमासाठी १,००० पुस्तके दान केली आहेत. हा उपक्रम त्यांच्या मूळ गावात स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वाचनालय उभारण्याचा आहे. बिरदेव हे कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातून यूपीएससी उत्तीर्ण होणारे पहिले व्यक्ती आहेत.

अलीकडेच, बिरदेव यांनी "बुके नव्हे, पुस्तके पाठवा" असे आवाहन करत समाजमाध्यमांवर एक भावनिक पोस्ट शेअर केली होती, जी देशभरात गाजली. या संदेशाने भारावून जाऊन, शिखर पहारिया यांनी शैक्षणिक आणि स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त अशा अनेक पुस्तकांची मोठी खेप गावाकडे पाठवली.

अतिशय साध्या पार्श्वभूमीतून आलेले बिरदेव यांनी २०२० ते २०२१ या काळात पोस्टमन म्हणून काम केले आणि त्याचवेळी यूपीएससीचा स्वप्न उराशी बाळगले. त्यानंतर ते दिल्लीला गेले, आर्थिक अडचणींशी झुंज दिली, पण हार न मानता मेहनत घेतली – आणि वयाच्या २७व्या वर्षी पहिल्याच प्रयत्नात आयपीएस झाले.

शिखर यांचे हे योगदान केवळ भेटवस्तू नाही, तर एक संदेश आहे – संधी, समता आणि शिक्षणाच्या माध्यमातून आयुष्य बदलण्याच्या शक्तीवरचा विश्वास. जसा विश्वास बिरदेव यांनी त्यांच्या प्रवासातून दाखवून दिला आहे.

या भेटवस्तूंच्या हस्तांतरणाचे फोटो आणि व्हिडिओ सध्या समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत, आणि नेटिझन्स दोघांच्याही कार्याची भरभरून प्रशंसा करत आहेत.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968